REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2023

# गिरीश कर्नाड यांच्या नाटकातील वाङ्मयीन विशेष

**डॉ. दयानंद लिंबाजी भोवाळ**
(मराठी विभाग प्रमुख)
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग, ता. तुळजापूर जि. धाराशिव.

## गोषवारा



गिरीश कर्नाड यांच्या नाटकाच्या वाङ्मयीन विशेषाचा अद्वितीय उदाहरण आहे. या नाटकातील वाङ्मय अत्यंत समझदार आणि विवेचनात्मक असतो. कर्नाड यांनी या नाटकात सामाजिक समस्यांचा उजागर केला आणि त्यांच्या कारणांच्या वाचनातून उत्तर दिले. गिरीश कर्नाडांची मिथककथावर आधारित असणारी नाट्यकृती 'अग्नि आणि पाऊस' मानवी जीवनातील द्वंद्वांना साकारणारी शब्दसृष्टी या नाटकात प्रभावीपणे आशयाला व्यापून टाकणारी अशीच आहे. 'अग्नि आणि पाऊस' या नाट्यकृतीतून साकारणारी शब्दसृष्टी पुढीलप्रमाणे सन्मानार्थ, परागंदा, नाट्यवेद, अंतरिक्ष, अर्वसु, अपकिर्ती, उच्छृंखल, अव्याहत, तापसी, इंद्रियदमन, कोथळा, अक्षत, वदंता, क्लृप्त्या, आत्मक्लेष, अधिष्टता, पर्जन्यसत्राचा अध्वर्यु, ऋत्विजाग्रणी, नीतिशून्य, विध्वंस, उमदा, पर्जन्यसत्र, वजकठीन, लालसा, इंद्रवृत्तासुर, कपाळकरंट्या, सृष्टीकर्ता, मर्त्य, इ. अशी ही शब्दसृष्टी नागमंडल या नाट्यकृतीच्या कथानकाला परिपूर्ण करते. शब्दसृष्टीच साहित्यविश्वाला कशा पद्धतीने पूर्णत्व देते याचा परिचय गिरीश कर्नाडांच्या भाषांतरित नाट्यकृतीवरून प्रत्ययास येते.

## परिचय

गिरीश कर्नाड हे भारतीय नाट्यशास्त्राच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य नाटककार आणि चित्रपट निर्माता होते. त्यांच्या नाटकांच्या विशेषता त्यांच्या संवेदनशीलतेवर, सामाजिक विचारांवर, आणि मानवी भावना व व्यक्तिमत्वांवर योगदानावर आधारित आहे. गिरीश कर्नाड यांच्या नाटकांत त्यांनी विविध समाजिक व सांस्कृतिक समस्यांचा चित्रण केले . आणि त्यांच्या चरित्रांना अत्यंत सांगतात्मक रूपांतर दिला. त्यांच्या नाटकांमध्ये वाङ्मयीन विशेषता त्यांच्या विचारांच्या ताणावर, भाषेच्या तंत्रावर, आणि नाट्यशैलीतील अनुभवावर आधारित आहे. उदाहरणार्थ, त्यांच्या नाटक 'बलि' मध्ये स्त्रीच्या भूमिकेचा अत्यंत संवेदनशील विवेचन केला गेला आहे, ज्यामुळे स्त्रीच्या अंतर्मनाच्या आणि समाजातील आपल्या स्थानाच्या समस्यांचा गमन केला जातो. त्यांच्या नाटकांमध्ये सामाजिक अशा विचारांच्या परिरक्षणात त्यांच्या विशेष वाङ्मय दिसतो, ज्यामुळे त्यांची

कल्पनाशक्ती, भाषांतरण, आणि नाट्यशैलीतील नवीनता दिसते. गिरीश कर्नाड यांच्या नाटकांच्या वाङ्मयीन विशेषता यांच्या कलेतून आणि त्यांच्या समाजातील दृष्टिकोणातून वाचता म्हणजे त्यांचा नाटक सर्वात महत्वाचा आणि संवेदनशील आहेत.

## कार्यपद्धती

गिरीश कर्नाड यांच्या नाटकांच्या वाङ्मयीन विशेषात, त्यांची कार्यपद्धती अत्यंत सांगतात्मक आणि समझदार असते. त्यांच्या नाटकांच्या कलात्मक दृष्टीकोनातून, भाषांतरात, आणि संवेदनशीलतेत विशेषता दिसते. त्यांचे कार्यकलाप खूप जणांच्या विचारांच्या ताणावर, समाजातील आपल्या स्थानाच्या समस्यांच्या विश्लेषणावर, आणि मानवी भावनांच्या समीक्षेत आधारित आहे. त्यांच्या नाटकांमध्ये सामाजिक, राजकीय, आणि व्यक्तिमत्त्वांच्या विविध पहाटेच्या संदर्भातील आवृत्तींचा वाचन केला जातो. त्यांच्या कथांतरात दृष्टिकोणांची विशेषता, विविधतेचे मानसिक प्रदर्शन, आणि वाङ्मयाच्या तंत्राची उत्तम उपयोगीता येते. गिरीश कर्नाड यांच्या नाटकांच्या कलाप्रवाहात भाषेच्या सहाय्याने सांगतात्मकता, अनुभवाचा साझा करण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे त्यांच्या कलात्मक दृष्टीकोनात वाजवी दिसते.

गिरीश कर्नाडांच्या भाषांतरित नाट्यकृतीतून साकारणाऱ्या जीवनानुभवांना शब्दसृष्टींनी जिवंतपणा आणला आहे. शब्दसृष्टीही नाट्यकृतीचा आत्मा असते. यशवंत पाटणे शब्दसृष्टीविषयी म्हणतात की, " नाट्यलेखक शब्दांच्या साह्याने त्यांना आकार, अस्तित्व देतो. एकूण शब्द हाच नाटकाचा आत्मा असतो." १. पाटणे यांनीही शब्दसृष्टी नाट्यलेखकाचे प्रमुख अस्त्र कसे आहे हेच सांगितले आहे. कर्नाडांनी आपल्या वैविध्यपूर्ण नाट्यलेखनात शब्दांच्या साह्याने नाट्यविषय रंगविले आहेत. गिरीश कर्नाडांच्या 'तुघलक' या ऐतिहासिक नाट्यकृतीतून अशीच शब्दसृष्टी पाहायला मिळते. या नाटकातून साकारणारी शब्दसृष्टी ऐतिहासिक जीवनजाणीवांना समृद्धपणे साकारते. ऐतिहासिक जीवनाला या शब्दसृष्टीतून तुघलकाचा इतिहास बघायला लावणारे हे एक नाटक आहे. 'तुघलक' या नाट्यकृतीतून साकारणारी शब्दसृष्टी अशी आहे. तख्तावर, जमाल, दिनार, बालंबाल, कालत्रयी, टेहळणी, हिकमती, राहुटी, उपमर्द, टाकसाळ, घिसाडघाई, अबघडी ही शब्दसृष्टी तुघलकाच्या राजकीय जीवनाचे प्रभावी आणि प्रत्ययकारी चित्रण करते.

## प्रास्ताविक

गिरीश कर्नाड हे जागतिक स्तरावरील एक प्रतिभासंपन्न बहुचर्चित प्रयोगशील नाटककार आहेत. प्रगल्भ प्रज्ञा प्रतिभाशक्ती बळावरती १९६१ पासून ते आजपर्यंत जागतिक रंगभूमीवरती अधिराज्य करीत आहेत, भारतीय संस्कृतीचे, सामाजिक, धार्मिक, नैतिक मूल्यांचे चिंतन करीत असतानाच, मानवी जाणिवांच्या शोध घेतला आहे. कन्नड रंगभूमीला तसेच भारतीय रंगभूमीला नैतिकमूल्याचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. गिरीश कर्नाडांचा मूळ पिंड हा प्रतिभासंपन्न नाटककाराचा असल्यामुळे त्यांच्या अंतरंगातून कन्नड रंगभूमीने भारतीय रंगभूमीला एक वैभवशाली परंपरा प्राप्त केल्याचे दिसून येते. म्हणून नाट्यक्षेत्रामध्ये त्यांचे योगदान अतुलनीय स्वरूपाचे आहे हे सर्वमान्य आहे.

सर्जनशील लेखक, मनस्वी माणूस आणि नाट्यक्षेत्रातील एक अभ्यस्त सुजाण नाटककार म्हणून गिरीश कर्नाड यांची प्रतिमा गेली अनेक दशके मराठी तसेच कन्नड रसिकात कायम आहे. रंगकर्मी नाटककारात गोवले जाणारे हे व्यक्तिमत्त्व नाट्यधमर्मी असल्याने नाट्यलेखनातील अवडंबर, अनुकरण, चाकोरी, हिणकसपण यांच्यावर शरसंधान करताना कधी शरमले नाहीत. मराठी आणि कानडी भाषेचे द्वंद्व साधून नाट्यधर्मी गिरीश कर्नाड यांनी आपल्या नाट्यलेखनांनी मराठी आणि कानडी

रसिकांना मंत्रमुग्ध करून ठेवले आहे. एक अनमोल असा ठेवा ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, लोककथात्मक अशा बहुरंगी स्वरूपात नाटकाच्या रूपाने जनमानसापर्यंत पोचविला आहे. सकस अशा नाट्यलेखनाने आपली छाप नाट्यरसिकांच्या मनावर उमटविणाऱ्या या नाट्यधर्मीच्या नाट्यलेखनाचा अभ्यास अनेकांगानी आज होताना दिसतो. म्हणूनच या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या लेखनाचा अभ्यास करण्याची ऊर्मी माझ्या मनात निर्माण झाली आणि गिरीश कर्नाड यांच्या भाषांतरित मराठी नाटकांचा अभ्यास करण्याचे योजिले आहे.

## गिरीश कर्नाड यांच्या नाटकाचे वाङ्मयीन विशेष

या प्रकरणात गिरीश कर्नाड यांच्या नाटकांतील वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास करावयाचा आहे. गिरीश कर्नाड यांच्या नाटकांचा खजिना मराठी रसिकांना, समीक्षकांना भाषांतराच्या  रूपाने मराठी साहित्यिकांनी करून दिला आहे. गिरीश कर्नाडांनी कन्नड भाषेत अनेकविध नाटके लिहिली आहेत. या त्यांच्या नाट्यलेखनाने भारावलेल्या मराठी साहित्यिकांनी त्यांच्या नाट्यकृतीचे मराठीत भाषांतर केल्याचे दिसून येते, गिरीश कर्नाडांनी आपल्या लेखनात वाड्मय निकषांचे तंतोतंत उपयोजन केल्याचे त्यांच्या भाषांतरित झालेल्या नाट्यकृतीवरून सांगता येते. गिरीश कर्नाडांनी अभिजात संपन्न प्रतिभेने आपले नाट्यलेखन सादर केल्याने , त्यांच्या नाट्यलेखनात वाङ्मयीन विशेष वेगवेगळ्या रूपाने पानोपानी नाट्यकृतीतील आशयातून दिसून येते.

गिरीश कर्नाड यांच्या नाटकांच्या वाड्मयीन वैशिष्टे यांचा विचार करीत असताना , शैली, रचना, मांडणीचे सर्वसाधारण स्वरूप या वैशिष्ट्यांकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाते. वाङ्मयीन कलाकृती जेव्हा यशस्वीपणे कार्य करीत असते तेव्हा ही वैशिष्ट्येच पायाभूत असलेली दिसून येतात. वाङ्मयाच्या निकषानुसार वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा विचार करताना , वाड्मय सिद्धांत किंवा वाङ्मयाचे समर्थन या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्यावा लागतात. या विषयी आपले विचार व्यक्त करताना

पु. दी. धर्माधिकारी यांच्या मताची पुष्टी देता येते. ते म्हणतात, " वाङ्मयाच्या वैशिष्ट्यांचा विचार करताना वाङ्मयसिद्धांत किंवा वाङ्मयाचे समर्थन यांपैकी एकावर भर पडेल. कारण वाङ्मय हे इतिहास किंवा चरित्र यांच्यापेक्षा व्यापक आणि मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र यांच्यापेक्षा जास्त निश्चित आहे. वाड्मयीन पद्धतीमध्ये कलाकृती आणि काळ यांच्यानुसार व्यापकता आणि निश्चितपणा बदलत असतात**".**२. धर्माधिकारी यांच्या मताचा परामर्श घेताना असे जाणवते की, बदलत्या काळानुरूप कलाकृतीची व्यापकता आणि निश्चितपण बदलत जातात आणि त्याचबरोबर वाङ्मयीन विशेषही बदलताना दिसतात. गिरीश कर्नाडांच्या नाट्यलेखनातून लौकिक जीवन, ऐतिहासिक जीवन, सामाजिक जीवन संदर्भ आलेले आहेत. या जीवन संदर्भानुसार आशय, अभिव्यक्ती, प्रतिमा, प्रतीके यांत फेरबदल झाल्याचे दिसून येते. गिरीश कर्नाड यांच्या समग्र नाटकातील वाङ्मयीन विशेषांचा आशयअभिव्यक्ती, प्रतिमा, प्रतीके, मिथकाचे स्वरूप, शब्दसृष्टी, मानवी भाव-भावना, सांस्कृतिक जाणिवा, सामाजिक जाणिवा, शब्दसौंदर्य, शैलीसौंदर्य अशा वेगवेगळ्या अंगांनी विवेचक व विस्तृत विचार करता येईल,

## आशय अभिव्यक्ती

'आशय अभिव्यक्ती ' हा नाट्यलेखनाचा प्रमुख वाङ्मय विशेष मानता येतो. लेखक आशयाच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असतो. साहित्यकृतीतील त्याची अभिव्यक्ती त्या साहित्यकृतीला बंदिस्त करीत असते. लेखकाच्या मनाशी ठरलेल्या आशयातून नाट्यकृतीचा जन्म होतो आणि ती विकसित होते. ती मुळात आशय अभिव्यक्तीतूनच म्हणून आशय अभिव्यक्तीला

नाट्यलेखनाचा प्रमुख वाङ्मय विशेष मानावे लागते, "आपल्या मनाशी ठरविलेल्या आशयाला नाटककार कोणते वळण देतो यावर त्या नाटकाचा रचनाप्रकार अवलंबून असतो ".३. हे प्रा. यशवंत संभाजीराव पाटणे सांगतात ते याच अर्थाने. त्यामुळे वाङ्मयीन विशेषांचा विचार करत असताना आशय अभिव्यक्तीला सोबत घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही.

अभिव्यक्ती हा नाटकाचा प्राण होय. नाटक हे मूलतः एक परिणामकारक साहित्यकृती आहे. नाटक हा दृश्य, श्राव्य साहित्यप्रकार असल्याने तो एक परिणामकारक साहित्यप्रकार म्हणून समाजात नावारूपाला आलेला आहे. लेखक आपल्या आपल्या अनुभव विश्वाला संहिताबद्ध करून अभिव्यक्त होत असतो. नाट्यकृतीचा आशयच रसिक आणि नाट्यकृती यांच्यात सहसंबंध प्रस्थापित करीत असतो. रसिकांनी नाट्यकृतीच्या सहसर्जक क्रियाव्यापारातून आशयाची परिणामकारकता सिद्ध होत असते. आशयाची अभिव्यक्ती करीत असताना रसिक मनाला विचारात घेतल्याशिवाय लेखकाला पुढे जाताच येत नाही. गिरीश कर्नाडांच्या विविध नाट्यातील आशय अभिव्यक्तीची ओळख खालीलप्रमाणे करून घेता येईल.

गिरीश कर्नाड आपल्या नाटकांच्या वैविध्यपूर्ण आशयातून अनुभवांना व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या मूळ कन्नड भाषेत असणाऱ्या साहित्यकृती मराठीत भाषांतरित झालेल्या आहेत. या नाट्यकृतीतून भिन्न स्वरूपाचे आशय अभिव्यक्त होताना दिसतात. आशय अभिव्यक्तीत लेखक आपल्या आणि आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, विचार, भावानुभूती, जीवन जाणिवा, विचारप्रणाली, त्यांचे जीवन, युगप्रवृत्ती या सर्व बाबींची मांडणी करीत असतो.गिरीश कर्नाडांनी 'काटेसावरी' या नाटकातून भारतीय संस्कृतीचे अधःपतन आणि पाश्चात्त्य संस्कृतीविषयी आत्मिक अनुबंध जोडण्याचा प्रयत्न आजचा तरुण कशा पद्धतीने करत आहे हे स्पष्ट करून बदलत्या जीवनशैलीचे नेमकेपण आणि आशयसूत्राच्या मांडणीतून मानवी जीवनातील गुंतागुंतीचे चित्रण आशयातून व्यक्त केले आहे. या नाट्यकृतीतून होणारी अभिव्यक्ती या नाट्यात गडद गहिरे रंग भरताना दिसते, आणि म्हणूनच ती या नाटकाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरते.

कर्नाडांनी 'हयवदन' या नाटकातून पारंपरिक लोककथेला आपल्या अभिव्यक्तीची जोड देऊन नाट्य साकार केले आहे. अनेकार्थसुचकता असणारी ही कथा समर्थ प्राक्कथा आहे. या नाट्यकृतीतील कथेला अनेक पातळ्यांवर नानाविध पैलू आहेत. कर्नाडांनी आपल्या अलौकिक प्रतिभेच्या जोरावर या नाट्यकृतीतून या कथेला तिच्या आशयाला नवनवीन परिणाम देऊन साकार केले आहे. 'हयवदन' या नाट्यकृतीतील आशयासंदर्भात डॉ. तारा भवाळकर म्हणतात की, "हयवदनची मूळ आधार कथा 'कथासरित्सागरातल्या' वेताळ पंचिवेशीतील एक कथा आहे. खरतर हा आधार नाममात्रच आहे. कर्नाडांनी मूळ कथेत खूपच फेरबदल केले आहेत आणि तरीही कथेतील केंद्रवर्ती कल्पना कायम आहे."४. डॉ. तारा भवाळकरांनीही या ठिकाणी आशय अभिव्यक्तीला प्राधान्य दिलेले दिसून येते. कर्नाडांची 'अग्नि आणि पाऊस' ही नाट्यकृती दोन परस्परविरोधी भौतिक तत्त्वाची प्रतिद्वंद्वी भाव व्यक्त करते. त्याचबरोबर इंडोआर्यन (संस्कृत) व द्रविड भाषा, अखिल भारतीय आणि प्रादेशिक दृष्टिकोन, अभिजनमार्गी परंपरा व साधी देशी परंपरा, उदात्त आणि ऐहिक तसेच कदाचित धार्मिक आणि लौकिक अशा स्वरूपाचे द्वंद्व या नाट्यकृतीच्या आशयातून साकार होताना दिसते. या द्वंद्वाला गिरीश कर्नाडांनी आपल्या आशय अभिव्यक्तीच्या जोरावर नाट्य रसिकापर्यंत कशा पद्धतीने पोचविले आहे. हे सांगत असताना माधव वझे म्हणतात की, " धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थाची घटनांच्या साह्याने घुसळण करीत अखेरीला इंद्र व वृत्रासुर या मिथ्यकथेचा चपखल नाटकीय उपयोग करून कर्नाड नाटक 'मोक्षा'प्रत नेतात. भयचकित करणारे माणूसपणाचे दर्शन असे 'अग्नी आणि पाऊस'चे वर्णन करता येईल". ५. गिरीश कर्नाडांनी चारही पुरुषार्थाचे मर्म आणि प्रचिती 'अग्नी आणि पाऊस' या नाटकातील आशय अभिव्यक्तीमधून स्पष्ट करीत असताना, माणसाच्या मानवीपणाचा चित्र पात्रांच्या जीवनशैलीतून व्यक्त केल्याचे दिसून येते. तर कर्नाडांच्या 'टिपू सुलतानचे स्वप्न' या

नाट्यकृतीतून टिपू सुलतानाच्या जीवनाची शोकांतिका सादर करणारा आशय व्यक्त होताना दिसतो. या आशयाला आपल्या कल्पनाचातुर्याच्या आणि शब्दचातुर्याच्या जोरावर कर्नाडांनी फुलविले आहे. म्हणूनच कर्नाडांच्या नाटकाचे वाङ्मयीन विशेष अभ्यासत असताना आशय अभिव्यक्तीला प्राधान्य द्यावे लागते. 'ययाती' हे गिरीश कर्नाडांचे पहिले नाटक. कर्नाडांनी या नाटकातून सम्राट ययातीच्या जीवनाची गाथा साकार केली आहे. ऐतिहासिक स्वरूपाच्या या आशयाला कर्नाडांनी तितक्याच ताकदीने आपल्या नाट्यकृतीतून जिवंतपणे मांडले आहे. कर्नाडांच्या आशयअभिव्यक्तीची ओळख या नाटकाने संपूर्ण समाजाला घडवून दिली. त्यांच्या या नाट्यगुणाचे कोडकौतुक करण्यास वर्तमानपत्रेही सज्ज झाल्याचे पुरावे आपल्याला मिळतात. त्यांच्या 'ययाती' या नाट्यकृतीविषयी दैनिक संचारमध्ये अभिनव कुलकर्णी म्हणतात, “ त्यांचे 'ययाती' हे पहिले नाटक गाजले. महाभारतातील व्यक्तिरेखांवर आधारित हे नाटक कर्नाडांना ओळख मिळवून देणारे ठरले. तब्बल सात भारतीय भाषेत ते लगेच भाषांतरित झाले ” ६. प्रतिभासंपन्न कर्नाडांच्या अभिव्यक्तीला ‘ ययाती ’या नाटकाने भाषांतराच्या रूपाने अनेक भाषिक समाजापर्यंत पोचविल्याचे दिसून येते.  नागमंडल' ही नाट्यकृती म्हणजे एक मिथककथा आहे, यातील कथा कुठल्याच वास्तवाशी जवळची नाही. कर्नाडांनी आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर आशयाची गुंफण करून आपल्या मनातील भावभावनांची अभिव्यक्ती साकारलेली आहे. हे सारेच रसिकतेला स्वप्नरम्यतेचा अनुभव देऊन जीवनार्यशोधक नाणिवेला चक्रावून टाकणारे आहे. या मिथककथेतून कर्नाडांनी शाश्वत जीवनाची मूल्ये साकार करण्याचा प्रयत्न केल्याचे मान्य करावे लागते.

## प्रतिमा-प्रतीके

नाट्यकृतीचा दुसरा आणि महत्त्वाचा वाङ्मयीन विशेष म्हणजे प्रतिमा-प्रतीके ही नाट्यकृतीला प्रभावीपणे नाट्यरसिकांपर्यंत पोचवीत असतात. गिरीश कर्नाडांनी आपल्या नाट्यकृतीतून अनेकविध प्रतिमा प्रतीकांची योजना केलेली आहे. प्रतिमा या भूतकालीन संवेदना व सेंद्रीय अनुभवाच्या पुनर्निर्मितीचे स्मरण करून देणारे असतात. या विषयी आपले विचार व्यक्त करताना पु. दी. धर्माधिकारी म्हणतात “प्रतिमा हा मानसशास्त्राचा आणि वाङ्मय अभ्यासाचा विषय आहे. मानसशास्त्रात 'प्रतिमा' या शब्दाचा अर्थ भूतकालीन संवेदनात्मक किंवा सेंद्रिय अनुभवाची पुनर्निर्मिती, स्मरण असा होतो. तो अनुभव प्रत्यक्ष, दृष्टीचा असणे आवश्यक नसते”. ७. गिरीश कर्नाड यांच्या अनेकविध नाट्यकृतीतून विविध प्रतिमा प्रतीकांचा निर्देश झाल्याचे दिसून येते. या प्रतिमा प्रतीकांच्या माध्यमातून गिरीश कर्नाडांच्या एकूणच आशयाला जोरकसपणा, प्रगल्भपणा आप्त झालेला आहे. कारण प्रतिमा आणि प्रतीकेच आशयाला ताकदीने व प्रभावीपणे साकार करतात. कर्नाडांच्या नाटकातून ऐतिहासिक आणि पौराणिक जीवनाचे प्रतिनिधित्व घेऊन अनेक प्रतिमा साकारताना दिसतात. या प्रतिमा संवेदन किंवा सेंद्रीय अनुभवाच्या रूपात साकार होतात. तशाच त्या कांही अदृश्य किंवा आंतरिक बाबीसाठीही उभ्या राहताना दिसतात. प्रतिमांतून मानवी समाजजीवनातील वास्तव्य सत्याचे दर्शन घडत असते. असे वास्तव जीवन दर्शन गिरीश कर्नाडांनी आपल्या नाट्यकृतीतील प्रतिमा प्रतीकांच्या स्वरूपाने घडविले आहे.

गिरीश कर्नाडांनी पौराणिक कथा आशयाला प्रतिमा प्रतीकांच्या माध्यमातून आविष्कृत केले आहे. त्यांची 'नागमंडल' ही एक नाट्यकथा आपल्या सर्जनशील मनाला, कल्पना विश्वाचे पलीकडे घेऊन जाते. या नाटकातून साकारणारे जीवनविश्व रसिकतेला स्वप्न रम्यतेचा अनुभव देणारे आहे. 'नागराणी' च्या स्वप्न राज्यात घेऊन जाणारी ही कथा या कथेत पुरुषत्वाचे प्रतीक होऊन नाग तर नागाचे प्रतिनिधी पुरुष आहेत. अशा या अधिबंधातून ही कथा घडत जाते. या नाट्यकथेतील प्रतीकाविषयी

विचार व्यक्त करत असताना डॉ. तारा भवाळकर यांचे मत विचारात घेऊन पुढे जाता येते. त्या म्हणतात, गिरीश कर्नाडांच्या 'अग्नि आणि पाऊस' या नाट्यकृतीतही प्रतिमा-प्रतीकांचा निर्देश झाल्याचे दिसून येते. वा प्रतिमांतून कर्नाडांनी समाजातील वास्तव सामाजिक प्रश्नांचा वेध घेतला आहे. कर्नाडांनी या वादाला प्रतिमांच्या साह्याने प्रत्यक्ष वास्तवाचाच एक भाग बनविले आहे. प्रतिमा या वास्तवाचाच एक भाग बनून कशा अभिव्यक्त होतात त्या विषयी प्रा. रा. ग. जाधव म्हणतात की, "प्रतीकात्मक वास्तव हा ही वास्तवाचाच एक अर्थपूर्ण अवतार असतो" .८. प्रा. रा. ग. जाधव यांनी प्रतीकात्मकतेतून वास्तव जीवनाचाच अवतार कसा होतो हे सांगितले आहे. ते कर्नाडांच्या प्रतिमा-प्रतीक चित्रणाला प्रभावीपणे लागू पडते. कर्नाडांनीही 'अग्नि आणि पाऊस' या नाट्यकृतीत आगिक, वाचिक, सात्त्विक आणि आहार्य अभिनयासारख्या संकेतामधून माणसांच्या सुख दुःखमय जीवनाचे दर्शन घडते. विश्वरूप इंद्रदेव ब्रह्मराक्षस यक्ष व अनेक प्रतिमा- प्रतीकांतून नाट्यकृतीचा आशय उलगडतो हे कर्नाडांच्या भाषांतरित नाट्यकृतीवरून पाहावयास मिळते.

गिरीश कर्नाडांच्या 'बलि' या नाट्यकृतीतूनही प्रतिमा-प्रतीके चित्रित झाल्याचे दिसून येते. मानवी जीवनातील हिंसा-अहिंसा या तत्त्वावर कर्नाडांनी या नाट्यकृतीतून प्रकाश टाकला आहे. 'कणकेच्या कोंबड्याची' प्रतिमा अहिंसा तत्त्वाला घेऊन नाट्यकृतीतून साकार होते व आशयाला प्रगल्भ करण्यासाठी तो एकच प्रतिमा प्रेरक ठरल्याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. या प्रतिमा शाब्दिक स्वरूपाच्या नसल्या तरी त्यांना एक विशिष्ट अर्थ व महत्त्व प्राप्त झालेले असते. हे सांगताना माधव वझे म्हणतात, "शरीरामधून निर्माण होणाऱ्या शारीरिक प्रतिमा या शाब्दिक प्रत्तिमा निर्माण करीत नाही. पण त्या प्रतिमांना एक अर्थ असतो आणि त्याचं असं एक महत्त्व असतं" ९. माधव वझे यांनीही प्रतिमांच्या अर्थाला प्रमुख व महत्त्वाचे मानलेले आहे. एकूणच गिरीश कर्नाडांच्या प्रतिमा प्रतीके तत्त्वज्ञानात्मक वृत्तीने अभिव्यक्त झाली असली तरी नाट्यकृतीतील आशयाभिव्यक्ती आणि अर्थनिरुपणाच्या व जीवनदर्शनाच्या भूमिकेतून स्पष्ट झाल्याचे दिसून येते आणि म्हणूनच गिरीश कर्नाडांच्या भाषांतरित नाट्यकृतीचा एक प्रमुख वाड्मयीन विशेष म्हणून ही प्रतिमा प्रतीकांचे विवेचन केलेले आहे.

## मिथककथांचे स्वरूप सौंदर्य

गिरीश कर्नाडांच्या एकूणच नाट्यकृतीच्या आशयाच्या मुळाशी मिथककथा असल्याचे दिसून येते. या मिथककथांनी कर्नाडांच्या प्रतिभासंपन्नतेचे पुरावे या नाट्यकृतीतून साकारलेले आहेत. या मिथककथाविश्वाने कर्नाडांच्या नाट्यधर्मिपणाला व्यापून टाकलेले आहे. या मिथककथांतून कर्नाडांनी अलौकिक जीवनविश्वाचे दर्शन नाट्यरसिकांना घडवून दिले आहे. या ठिकाणी गिरीश कर्नाडांच्या वाड्मयीनविशेषणांच्या अनुषंगाने मिथकांचे स्वरूप आपल्याला पाहता येईल, मिथककथा म्हणजे मनाचे स्वरूप स्पष्ट करणारे विशेष आविष्कार होय. मिथक कथा म्हणजे काय ? हे सांगताना म्हणतात की, मिथक म्हणजे पुराणकथा अथवा दैवतकथा किंवा त्या प्रकृतीची कथा, इंग्रजीत 'मिथ' या संज्ञेचा भारतीय पर्याय, अलौकिकाचा रंग ल्यायलेली, लोकानुभूती व्यक्त करणारी कथा म्हणजे मिथककथा होय मिथकातून लोक जीवनातील लौकिक व अलौकिक जीवनाभूती अभिव्यक्त झालेली असते. त्यामुळे मिथक पौराणिक सवरूपाचे असले तरी आजच्या आधुनिक काळातील मानवी जीवनाची, सामाजिक, धार्मिक, लोकपरंपरेची अभिव्यक्ती होत असते. म्हणून मिथकाचे स्वरूप काल, आज आणि उद्या ही असण्याची शक्यता आहे. मिथककथातून मानवी जीवन व्यवहार अनेकांगानी साकारताना दिसून येतो.

मिथककथा म्हणजे काय? याचा विचार करून गिरीश कर्नाडांच्या मिथककथेविषयी पुढीलप्रमाणे सांगता येते. मिथक म्हणजे सूचित केलेली वर्णन असतात. मिथकातून एक मर्मदृष्टी अनुभवास येते. मिथक ही एक ऐतिहासिक जीवन घटनांचा

प्रवास उलगडत जाणारी असतात. तसेच ती प्राचीन काळापासून (पारंपरिक) लोकप्रियही असतात. या मिथकात लोकप्रिय श्रद्धा मूर्त झालेल्या असतात. मिथकात एक अधिबंध समाविष्ट झालेला असतो. या अधिबंधातून मिथककथा व्यक्त होतात. मिथकाविषयी सर्वसमावेशक व व्यापक अशी व्याख्या देत असताना राजीव नाईक म्हणतात, "ज्यात अधिबंधात्मक पात्र, अधिबंधात्मक प्रसंग आणि म्हणून अधिबंधात्मक विषयही आहेत. जी एखाद्या मोठ्या महाकाव्याचा एक भाग होऊ शकते किंवा स्वतंत्रही राहू शकते. जिच्यात काव्यात्मकतेवर, सार्वत्रिकतेवर, चिंतनावर आणि धुसरतेवर (ज्यामुळे एकापेक्षा अधिक अर्थ निघू शकतील) भर दिला असेल अशी गोष्ट म्हणजे मिथक" १०. नाईकांची ही मिथकाची व्याख्या विचारात घेता गिरीश कर्नाडांच्या नाटकातून साकारणाऱ्या मिथककथा वरील मनाच्या आशयाशी निगडीत आहेत. म्हणूनच त्यांचे वाङ्मयाचे एक विशेष म्हणून मिथककथा विषयी विवेचन केले आहे.

गिरीश कर्नाडांच्या नागमंडल, हयवदन या व अशा अनेक नाट्यकृतीतून मिथककथा साकारलेल्या आहेत. 'नागमंडल' या साहित्यकृतीतून साकारणारी मिथककथा स्वप्नाद्भुत नाट्यकथा आहे. पौराणिक जीवनजाणीवांबरोबर ही कथा मिथककथांच्या अनुभूतीशी अनुबंधीत आहेत. मिथक आणि नाट्य यांचा सहसंबंध विचारात घेत असताना रा. चि. ढेरे यांच्या मताचा विचार करणे महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात की, "मिथक आणि नाट्य यांचे अतूट नाते आहे. मिथकांतूनच नाट्य उदय पावले आहे. उत्क्रांतही झाले आहे."११. मिथक आणि नाट्य यांच्या जाणिवांचा आविष्कार कर्नाडांच्या

नाट्यकृतीतून झाल्याचे दिसून येते. 'नागमंडल' या नाट्यकृतीचे कथानक मिथक कथाविश्वाच्या घटनांनी भरून राहिलेले आहे. माणूस आणि निसर्ग यांच्या संयोगाचे कल्पना विश्व या कथानकात गुंफलेले आहे, 'नागमंडल' या नाट्यकृतीचे संपूर्ण कथाविश्वच आपल्या रसिकतेला स्वप्नरम्यतेचा अनुभव देणारी आहे. मानवी मनाचा शोध अखंडितपणे जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत अशा मिथककथा काल, आज, उद्या घडतच असतात, निर्माण होत राहतात.

एक मुख्यकथा आणि दुसरी एक जोडीची उपकथा या नाट्यकृतीतून वास्तवातले विलक्षण आणि स्वप्नअद्भूत घेऊन अवतरणाऱ्या कथा आहेत. मानवी जीवन विश्वाला व्यापून टाकणारी ही कथा कुणा एकाची आहे असे म्हणताच येणार नाही. राणी आणि तिचा दिवसरात्र पुरुषांशी होणारा सहवास यातील तफावतीत अडकलेल्या जीवनकोड्यातून या नाट्यकृतीची कथा अधिकाधिक फुलत जाते. ही मिथककथा स्त्री जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारी आहे. सात्त्विक स्त्री जीवनाला साकारणारी ही कथा स्त्रीच्या रतिसुख प्राप्तीच्या हव्यासालाही तितक्याच ताकदीने पेलवून धरते. या नाट्यकृतीतून नाग आणि मानवी राणीचा पुत्रप्रधानापर्यंत जाणारा देहसंबंध रेखाटण्यात आला आहे. 'नागमंडल' या मिथककथेचा सखोल विचार करता प्रामुख्याने जाणवते की, जीवन विषयक काही शाश्वत मूल्य सांगण्याचे सामर्थ्य या कथेत सामावलेले आहे. नाग- राणीची मिथककथा एखाद्या स्वप्नाप्रमाणे आहे. 'नागमंडल' ही कथा अनुभवाच्या पातळीवरती स्पर्श करून सोडणारी अशीच आहे.

अप्पण्णा, राणी व नागराणीची प्रीती दिवस रात्रीच्या पुरुष रूपाचा राणीच्या मनावर पडणारा ताण, राणीच्या मनाची होणारी घालमेल, तिचे फुलत जाणे हे सारेच भावतरंग केवल अनुभवावेत असेच आहेत. मानवी मनाला विचारप्रवृत्त करण्याचे तसेच रसिकतेला स्वप्नाद्भुततेचा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य या मिथककथेत आहे. या मिथककथा काळानुसार चालत आलेल्या आहेत. या मिथककथांना अनेक मान्यवरांनी स्वीकारल्याची प्रचिती रा. चि. ढेरे यांनी दिली आहे. ते म्हणतात, "आजवरच्या सर्व महान प्रज्ञावंताना आणि प्रतिभावंतांनी मिथककथांच्या या सामर्थ्याचा अनुभव घेतला, दिला आहे ".१२. मिथककथांच्या सामर्थ्याचे महत्त्व रा. चि. ढेरे यांच्या वरील मतावरून पटते. तिचे सामर्थ्य अनेक प्रतिभावंतांना जाणवले याचीही जाणीव होते.

त्या प्रतिभावंतांच्या पंक्तीतील एक प्रतिभावंत असणाऱ्या गिरीश कर्नाडांच्या 'नागमंडल' भाषांतरित नाट्यकृतीचा एक वाङ्मयीन विशेष म्हणून मिथककथांचा विचार या ठिकाणी करता येतो.

गिरीश कर्नाडांचे मिथककथावर आधारित दुसरे एक नाटक म्हणजे 'हयवदन', या नाट्यकृतीत मिथककथा आणि आधुनिकता यांचे अद्भुत असे मिश्रण आहे. मानवी जीवनातील अंतर्विरोध, ध्येयासक्ती, संकटे आणि ताणतणावांना अत्यंत वास्तव आणि काल्पनिक स्वरूपात साकार केले आहे. प्रसंगानुरूप कथानकातून विकसित होत जाणारी ही मिथककथा प्रभावशाली आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. या नाट्यकृतीत पारंपरिक नैतिक मूल्याच्या जाणिवा व बारकावे नाट्यकृतीत अधिक प्रभावी व्यक्त झाली आहेत. या नाटकात पारंपरिक मूल्य आणि जीवनमूल्यांचा आविर्भाव होतोच त्याचबरोबरीने मानवी जीवनातील अतृप्त इच्छा-आकांक्षा यांच्याही छाया पडछाया, जाणिवा पाहावयास मिळतात. विविधांगी जीवन प्रसंगांनी साकारलेली ही नाट्यकृती मिथकाच्या साह्याने उठावदार होऊन साकार होते.

मिथककथांविषयी स्वतः गिरीश कर्नाड म्हणतात, "मिथककथा या अंधश्रद्धा असतात ? अंधश्रद्धा म्हटल्यावर आपण जे विधी गृहीत धरतो त्यापेक्षा मिथककथा खूप काही असतात. मिथककथा म्हणजे आपल्यापर्यंत आलेल्या गोष्टीचा आणि ज्ञानाचा संभार. आहेत गिरीश कर्नाडांनी एकूणच मिथककथांचे अंतर्बाह्य स्वरूप उलगडून दाखविले

'हयवदन' या नाट्यकृतीत शरीर मानवाचे आणि मस्तक घोड्याचे अशा मनुष्याच्या रूपापासून मिथककथेला प्रारंभ होतो. मानवी शरीर आणि डोकं या दोन्हीची श्रेष्ठता या मिथककतेतून रंगविण्यात आली आहे. या गूढ रहस्याची जाणीव या नाट्यकृतीतून होत जाते. देवदत्त, कपिल आणि पद्मिनी यांच्या जीवनाची 'हयवदन' ही मिथककथा आहे. 'हयवदन' हे नाटक यक्षगान स्वरूपाच्या शैलीअविष्कारात साकार झालेले आहे.'हयवदन' या प्रमुख पात्राच्या अनुषंगाने सुरुवात झालेली ही नाट्यकथा मानवी जीवनातील विविधांगाना स्पर्श करून जाते. मानवी जीवनातील प्रेम सुलभ जीवनानुभवांना शब्दबद्ध करणारी ही मिथके रसिकमनाला अधिक भावते. ती त्यातील प्रसंग चित्रणाच्या रूपाने ही मिथककथा मानवी जीवनातील सर्वांगांना स्पर्श करणारी अशीच आहे. शाप-उःशाप, मानवी जीवनाची गुंतागुंत, प्रेम सुलभ भावना, दोन जीवांची गुंतागुंत, कथानकातील गूढता आणि पात्रातील संवादांतील रेलचेल यांचे प्रभावी चित्रण या मिथककथेला एक परिपूर्ण स्वरूप दिल्याचे दिसून येते आणि म्हणूनच गिरीश कर्नाडांच्या नाट्यलेखनाचा एक प्रमुख विशेष म्हणून त्यांच्या मिथककथा विचारात घ्याव्या लागतात.

मिथककथेवर आधारलेली गिरीश कर्नाडांची आणखी एक नाट्यकृती म्हणजे 'बलि'. या नाट्यकृतीत 'कणकेच्या कोंबड्याची' मिथककथा आलेली आहे. हिंसा-अहिंसा या तत्त्वावर आधारित नाट्यकृतीत कर्नाडांनी अनेकविध प्रश्नोप्रश्नांचा आढावा घेतलेला आहे. मानवी समाजातील अनेकविध विषयांना हात घालणारी ही मिथककथा वर्तमान समाज व्यवहाराला सर्वांगाने व्यापून ठेवणारी अशीच आहे. स्त्री जीवनातील विविध जाणिवांना अधोरेखित ही नाट्यकृती विशेषच म्हणावी लागेल. स्त्रीने स्वतःच्या स्वयंपूर्णतेसाठी केलेली खटाटोप, राजकीय जीवन जाणिवांना, ध्येयधोरणांना अंगीकारणारी स्त्री या नाट्यकृतीत चित्रित होते. या धर्तीवरती गिरीश कर्नाडांच्या नाट्यकृतीचा एक प्रमुख विशेष म्हणून मिथककथा मानाव्या लागतात.

### मानवी भाव-भावना

साहित्य आणि समाज यांचे एक अतूट नाते असते. साहित्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. समाजाचे जीवन व्यक्त करताना लेखक समाजातील माणूस, त्याचे मन, त्याच्या भावभावना यांना आपल्या लेखनाचा विषय बनवीत

असतात. म्हणजे मानवी समाजजीवन त्यांच्या भावभावना या साहित्यनिर्मितीच्या प्रमुख प्रेरणा मानावी लागते. जीवनानुभव ही साहित्यकृतीच्या निर्मितीची खरी शिदोरी होय. लेखक हा ही सर्वसामान्य माणसासारखाच असतो, सर्वसामान्याबरोबर जीवन जगत असताना आपल्या प्रतिभेच्या साह्याने तो या मानवी जीवन व्यवहाराला शब्दबद्ध करीत असतात. सर्वसामान्याबरोबर असून सुद्धा तो असामान्य वाटतात. लेखकाच्या मनावर या सामाजिक मूल्याचा जो ठसा उमटलेला असतो त्याने प्रेरित लेखक मानवी धागेदोरे पकडून आपल्या अंतर्मनातील आशय अभिव्यक्तीला व्यक्त करीत असतात. त्यांच्या अंतर्मनात दडलेली माणुसकी, आपलेपणा त्याला प्रेरित करून लेखन करण्यास उद्दीपीत होतात. लेखकाच्या विशुद्ध माणुसकीतून होणाऱ्या निर्मितीविषयी बोलताना डॉ. सूर्यनारायण रणसुभे म्हणतात, "जर हे मन वर्ण, जात, धर्म, लिंग, संस्कार या सर्व भिंतींना ओलांडून विशुद्ध माणुसकीच्या पलीकडे जात असेल तर त्याच्या साहित्याला आपोआपच एक वैश्विक परिणाम लाभत जातो." १३. म्हणजेच रणसुभे यांच्या मतानुसार साहित्याची निर्मिती करण्यासाठी तसेच त्याला विशिष्ट दर्जा प्राप्त होण्यासाठी लेखकाच्या आत्मानुभूतीत विशुद्ध माणुसकीची बीजे अंकुरलेली असणे अत्यंत महत्त्वाचे असते. जातिव्यवस्था, कर्मकांडाच्या चौकटी उध्वस्त करून मानवतावादी विचारधारा साहित्यातून अभिव्यक्त होते तीच साहित्यकृती वैश्विक स्वरूपाची असते त्याची प्रचिती गिरीश कर्नाड यांच्या भाषांतरित मराठीतून दिसून येते.

## सांस्कृतिक जाणीवा

साहित्यकृतीतून सामाजिक, मानवी, वाङ्मयीन, सांस्कृतिक जाणिवा या व्यक्त होतच असतात. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे असे आपण म्हणतो. म्हणजेच समाजजीवनाचे मानवी संबंधाचे दर्शन घडविणे हे वाङ्मय प्रकाराचे प्रमुख कार्य आहे. नाट्यवाङ्मयात या जीवन जाणिवांचा दृश्याविष्कार घडविला जातो. जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांना लेखक शब्दबद्ध करीत असतात, मानवी समाजात वैविध्यता असलेली दिसून येते. प्रत्येक समाज आपआपली संस्कृती, जीवनमूल्ये सांभाळीत असल्याकारणाने समाजपरत्वे संस्कृतीची रुपे बदलताना दिसतात. समाजाचे दर्शन साहित्यकृतीतून होत असते. म्हणजेच पर्यायाने ते संस्कृतीचेही दर्शन असते हे नाकारता येणार नाही. सामाजिक जाणिवा या जशा साहित्याचे अंग बनून चित्रित होतात तशाच सांस्कृतिक जाणिवाही साहित्याचे एक अंग बनून व्यक्त होत असतात.

गिरीश कर्नाड यांच्या नाट्यकृतीचा वेगळेपणा व वाङमयीन मूल्ये

गिरीश कर्नाड हे भारतीय रंगभूमीवरील एक थोर नामवंत लेखक म्हणून ओळखले जातात. ते त्यांच्या नाट्यलेखनामूळेच. त्यांनी जी नाट्यनिर्मिती केली ती मूळात कन्नड भाषेत आहे. आज मराठी साहित्याच्या क्षेत्रात त्यांच्या सर्वच नाट्यकृती भाषांतरित झाल्याचे दिसून येते. कर्नाड यांनी ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, मिथककथात्मक अशी वैविध्यपूर्ण नाट्यनिर्मिती केलेली आहे. त्यांच्या नाट्यलेखनाच्या विषयापासून ते नाट्यकृतीतील आशयापर्यंत वेगळेपणा दिसून येतो. गिरीश कर्नाडांच्या नाट्यनिर्मितीभारतीय रंगभूमीलाच वेगळेपणचा प्राप्त करुन दिला आहे. गिरीश कर्नाडांनी वैविध्यपूर्ण विषयाची निवड नाट्यनिर्मितीसाठी करुन आपला वेगळेपणा सिद्ध केलेले आहेत. मानवी जीवनातील गंभीर प्रश्नांना गिरीश कर्नाडांच्या लेखणाने अगदी सहज आणि साधेपणातून व्यक्त केले आहेत.

गिरीश कर्नाडांनी ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, मिथककथात्मक अशी वैविध्यपूर्ण नाट्यनिर्मिती करीन नाट्यरसिकांना एकूण भारतीय रंगभूमीला एक अनोखी भेटच दिली आहे. त्यांच्या नाट्यकृतीतून साकारणारे विषय सर्वस्वी भिन्न असून ते त्यांच्या नाट्यकृतीतून एका नव्या दृष्टीकोनातून पहावयास मिळतात. कर्नाडांची प्रत्येक नाट्यकृती ही वर्तमान

समाजजीवनाला सोबत घेवूनच व्यक्त होताना दिसतात आणि अशा नाट्यकृती वेगळेपणाच्या लौकिकास साजेशा असतात. नाट्यकृतीच्या मूल्यमापनाविषयी प्रा. यशवंत संभाजी पाटणे म्हणतात की, "युग तत्त्वाचे भान असणारी साहित्यकृतीच वाङ्मयीन मूल्याचा मापदंड निर्माण करतो." १४. पाटणे यांनी नाट्यकृतीच्या वास्तविकतेवर भर दिलेला दिसून येतो. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडात गिरीश कर्नाड यांनी भारतीय रंगभूमीला एका अनोख्या विश्वाचे दर्शन घडवित असतानाच जे नाट्य साकारले तेच मुळी सामाजिक भावनेतून सर्वसामान्यांना आपलीशी वाटणारी नाट्यकृती करुन गिरीश कर्नाडांनी भारतीय रंगभूमीवर आपले नाव कोरले आहे. त्यांनी अनेकविध विषय व्यक्तिरेखा, कथानक. घटना-प्रसंग, भाषाशैली विविध भूमिकेतून आपले वेगळेपण सिद्ध केले.

गिरीश कर्नाडांनी आपल्या शैलीने भारतीय रंगभूमीला नाविन्यतेची जाणीव करुन दिले. भारतीय नाट्यपरंपरेतील स्वाभाविक सहजता कर्नाडांच्या नाट्यकृतीत असल्याने ते रसिकांच्या कसोटीस खरे उतरले आहेत. गिरीश कर्नाडांच्या सहजतेच्या कसोटीवर साकारलेल्या नाट्यकृतीवर वेगळेपणाची मोहर उमटली आहे. नवनिर्मितीसाठी प्रचंड कल्पनाशक्ती, अफाट वाचन, मनन, चिंतन, सुक्ष्म अवलोकन, कमी शब्द, विपूल आशयघनता, समाजातील विसंगती नेमकेपणाने हेरण्याची कल्पकता आणि प्रतिभासंपन्नता अशा अनेक गुणवैशिष्ट्यांनी त्यांच्या नाट्यकृतीत वेगळेपणा दिसून येतो. गिरीश कर्नाडांच्या नाट्यकृतीत कर्नाटकातील लोकपरंपरेची धार सापडते. कर्नाडांनी कर्नाटकातील जीवनविश्व आपल्या लेखणीने व प्रतिभासंपन्नतेने वास्तवतेचे कसोटीवर साकारल्याने या नाट्यकृती अलौकिक ठरल्या आहेत. माणूसपणाचा शोध घेत जाणाऱ्या कर्नाडांच्या नाट्यकृती मानवतेच्या वैविध्याला तेवढ्याच सामर्थ्यनि स्पष्ट करतात. तसेच मानवी जीवनाच्या समग्रतेला व्यापून टाकतात आणि म्हणूनच त्या वेगळेपणास पात्र ठरतात.

गिरीश कर्नाड मराठी भाषांतरित नाटकाचे मूल्यमापन करताना तिच्या अंतरंगातील आशय, अभिव्यक्ती विचारात घ्यावे लागतात, नाट्यकृती ही एक साहित्यकृती म्हणून व रंगभूमीवरील प्रायोगिक कृती म्हणून अशा दोन्ही अंगांनी तिचे मूल्यमापन करता येते. गिरीश कर्नाडांच्या एकूणच भाषांतरित नाट्यकृती या वैविध्यपूर्ण स्वरूपाच्या असल्याने त्यांच्या नाट्यकृतीचे मूल्यमापन करताना मूळ कथाबीज, संवाद, पात्र, भाषाशैली या व अशा अनेकविध अंगाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. वाड्मयाचे मूल्य करताना लेखकाच्या अनुभवविश्वाची संकल्पना विचारात घ्यावी लागते हे सांगत असताना प्रा. यशवंत संभाजी पाटणे म्हणतात की, " लेखकाची अनुभव घेण्याची क्षमता तो अनुभव मांडण्याची प्रतिभा यावर वाङ्मयाचे मोल ठरते, मूल्यमापन ठरते. भारतीय भाषांमधील इतर प्रांतातील नाटककारांच्या देवाण घेवाणीतून अनुभव संपन्नता वाढू शकते . हिंदीतील मोहन राकेश व कन्नडचे गिरीश कर्नाड, मराठीतील विजय तेंडूलकर हे एकमेकांच्या जवळ येण्यातून जी चर्चा झाली अनुभवाची शैलीची, देवाण-घेवाण झाली त्यातून नाटकांचा वाड्मयीन दर्जा वाढला."१५. प्रा. पाटणे यांनी साहित्यकृतीच्या मूल्यमापनात लेखकाच्या प्रकटीकरणावर भर दिल्याचे दिसून येते. म्हणजे एखाद्या साहित्यकृतीचे मूल्य ठरविताना लेखक आणि त्याची अभिव्यक्ती याचा विचार विचारप्रगल्भतेने करणे महत्त्वाचे वाटते.

गिरीश कर्नाडांच्या एकूणच नाट्यलेखनात त्यांच्या अनुभव संपन्नतेची अभिव्यक्ती निदर्शनास येते. कर्नाडांच्या नाट्यकृती भूतकाळाला हाताशी धरून वर्तमान जीवनाचे दर्शन घडवितात. नाट्यकृतीचे मूल्यमापन करताना तिच्या दुहेरी अंगाचा विचार करावा लागतो हे सांगताना प्रा. गो. के. भट म्हणतात की, "साहित्यातील अथवा नाट्यकलेतील वास्तवाची समीक्षा करताना त्या कलाकृतीत जीवनाचे दर्शन किती प्रत्ययकारी झाले आहे. एखादा प्रसंग किंवा दृश्य प्रत्यक्षानुभूतीशी किती जुळते आहे. म्हणजेच त्यात संभावना किती आहे हेच पहावे लागते" . १६. त्यांच्या मतातून नाट्यकलेतील वास्तवता स्पष्ट

होताना नाटकामध्ये आलेले विविध प्रसंग, त्यांची जीवनाभूती, पात्रांशी साधर्म्य कितपत साधते यावरुन देखील नाटकाचे मूल्यमापन केले जाते. नाट्यकृतीच्या दोन्ही अंगावर म्हणजेच साहित्यकृती म्हणून व प्रायोगिक कृती म्हणून तिचे मूल्य ठरविण्यावर भर दिल्याचे दिसून येते. गिरीश कर्नाडांच्या नाट्यकृतीचे मूल्यमापन करताना खालील घटकांच्या अनुषंगाने करता येईल.

## निष्कर्ष:

गिरीश कर्नाड यांच्या नाटकांमध्ये वाङ्मयीन विशेष अत्यंत समझदार आणि सांगतात्मक असतात. त्यांच्या कलात्मक दृष्टीने, भाषांतरात आणि नाट्यशैलीतील नवीनतेत त्यांची कल्पनाशक्ती दिसते. त्यांच्या नाटकांमध्ये सामाजिक, राजकीय, व्यक्तिमत्त्वांच्या विविध पहाटेच्या संदर्भात त्यांची विचारशक्ती आणि भाषांतर अत्यंत सामर्थ्यांच्या वापरात दिसतात. गिरीश कर्नाड हे एक प्रतिष्ठित भारतीय नाट्यकार आणि चित्रपटकार होते, ज्यांनी अभिनव नाट्यशास्त्रात वाङ्मयीन विशेषांचा महत्त्वपूर्ण वापर केला. त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या नाटकांच्या वाङ्मयीन विशेषांचा विचार, भाषांतर व भाषांतराची उपयोगीता मोठ्या मापावर सांगतात. त्यांच्या नाटकांमध्ये त्यांनी समाजातील, व्यक्तिमत्त्वांच्या, आणि मानवी भावनांच्या विविध पहाटेच्या संदर्भात वाङ्मयीन परिप्रेक्ष्य वापरला आहे. त्यांच्या नाटकांमध्ये भाषांतराचा उत्तम वापर केला जातो, ज्यामुळे त्यांच्या कथांतरात दृष्टिकोणांची विशेषता, भाषांतरणाचा समर्थन, आणि नाट्यशैलीतील नवीनता दिसते. गिरीश कर्नाड यांनी त्यांच्या नाटकांमध्ये सामाजिक, राजकीय, आणि व्यक्तिमत्त्वांच्या विविध पहाटेच्या संदर्भात त्यांची विचारशक्ती आणि भाषांतरातील उपयोगीता दिसते.

## संदर्भ सूची


१) सत्यशोधक तेंडूलकर (विजय तेंडूलकर यांच्या नाट्यकृतीचा सर्वांगीण अभ्यास), प्रा. यशवंत संभाजीराव पाटणे, संस्कृती प्रकाशन, पुणे-३०, पहिली आवृत्ती, ११ जाने. २००९, पृ.७.

२) वाड्मय सिद्धांत, पुरुषोत्तम दिगंबर धर्माधिकारी, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १ जाने. १९७८, १.२२.

३) यशवंत पाटणे सत्यशोधक तेडूलकर पान -२१३

४) नाट्यसमीक्षा: संहिता आणि रंगप्रयोग, डॉ. तारा भवाळकर, पृ.२९.

५) साप्ताहिक सकाळ दिवाळी अंक-१९९९, वर्ष १२, अंक ६, मुलाखत गिरीश कर्नाड, माधव वझे, संपा. सदा डुम्बरे, पृ. १६१.

६) दैनिक संचार, सोलापूर, अनिभव कुलकर्णी, ३ ऑगस्ट, २०१०.

७) वाङ्ङ्मय सिद्धांत, पुरुषोत्तम दिगंबर धर्माधिकारी, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १ जाने. १९७८, पृ.१७४.

८) वि. स. खांडेकरांचे साहित्य एक आकलन, संपा. डॉ. अविनाश अवलगांवकर, प्रकरण - खांडेकरांचे समीक्षालेखन, प्रा. रा. ग. जाधव.

९) साप्ताहिक सकाळ दिवाळी अंक २००४, मुलाखत विणापाणी चावला, माधव वझे, संपा. सदा डुम्बरे, पृ.१४०.

१०) नाटकातील मिथक, राजीव नाईक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृ.२२.

११) भारतीय रंगभूमीच्या शोधात, रा. चि. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९६, ५.२२९.

१२) भारतीय रंगभूमीच्या शोधात, प्रकरण मिथक आणि नाटक, रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, आवृत्ती जाने. १९९६, पृ.२२९.

१३) डॉक्टर सूर्यनारायण रणसुभे अस्मिता दर्श वार्षिका 2005 वर्ष 36 संपादक गंगाधर पानतावणे पान नंबर सात

१४) सत्यशोधक तेंडूलकर (विजय तेंडूलकर यांच्या नाट्यकृतीचा सर्वांगीण अभ्यास), प्रा. यशवंत संभाजीराव पाटणे, संस्कृती प्रकाशन, पुणे-३०, पहिली आवृत्ती, ११ जाने. २००९, पृ.७.

१५) सत्यशोधक तेंडूलकर (विजय तेंडूलकर यांच्या नाट्यकृतीचा सर्वांगीण अभ्यास), प्रा. यशवंत संभाजीराव पाटणे, संस्कृती प्रकाशन, पुणे-३०, पहिली आवृत्ती, ११ जाने. २००९, पृ.२५.

१६) गोविंद केशव भट भास्कृत स्वप्न वासव दत्त केशव भिकाजी ढवळे प्रकाशन कर्नाटका मुंबई पान नंबर 25